# महाराष्ट्र शासन

अधिष्ठाता यांचे कार्यालय
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु.), डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
OFFICE OF THE DEAN.
R.A.PODAR MEDICAL COLLEGE, DR.ANNIE BESANT ROAD, WORLI, MUMBAI 400 018
Ph.No.022-24934214/Tel Fax :- 022-24936881 E-mail ID:- deanrapmc@gmail.com

जा.क्र.राआपो/आस्था/ 6971 /२०२४ दिनांक :- 30 SEP 2024

## करार पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत.

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथील विविध विषयांच्या प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक या पदांवर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी विहित अटींची व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छूक उमेदवारांकडून परिशिष्ट "अ" च्या नमुन्यात अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई-४०००१८ येथे अ.क्र.१ ते १२ मध्ये नमूद विषयांकरिता दिनांक ०७.१०.२०२४ रोजी मुलाखतीसाठी (**Walk-in-interview**) सकाळी ठिक १०.०० वाजता उपस्थित रहावे. तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरावयाच्या पदांचा विषय व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|---|
| | | एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) |
| १. | संस्कृत संहिता सिध्दांत | .... | ०१ | .... |
| २. | शारिररचना | ०१ | ..... | ०१ |
| ३. | शारिरक्रिया | ०१ | ..... | ०२ |
| ४. | द्रव्यगुण | ०१ | .... | ..... |
| ५. | रसशास्त्र | ०१ | ०१ | .... |
| ६. | स्वस्थवृत्त | ०१ | .... | ०१ |
| ७. | अगदतंत्र | .... | ०१ | ०१ |
| ८. | रोगनिदान | .... | .... | ०१ |
| ९. | शालाक्यतंत्र | .... | .... | ०१ |
| १०. | कौमारभृत्य | .... | ०१ | ०१ |
| ११. | कायाचिकित्सा | .... | .... | ०२ |
| १२. | प्रसूतीतंत्र | .... | .... | ०२ |
| | एकुण रिक्त पदे | ०५ | ०४ | १२ |

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/ पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी करार पध्दतीवरील संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतां अथवा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता.<br>२) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयूर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>३) ज्या उमेदवारांचे मूळ शोध निबंध हे, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये पसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस, व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर प्राध्यापक या पदासाठी संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | :- | प्रतिमाह रु.१,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत).<br>तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यांत येईल. |

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/ पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी करार पध्दतीवरील संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल .<br>२) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयूर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>३) ज्या उमेदवारांचे मूळ शोध निबंध हे, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये पसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार उमेदवार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर ज्याला आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये एकूण ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संथेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून तीन वर्ष अध्यापनाचा अनुभव असला पाहीजे. |
| मानधन | :- | प्रतिमाह रु.८०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यांत येईल. |